# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (REPRESENTATION) क्रमांक ४८ / २०२४

वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्याबाबत

राजेंद्र आण्णाप्पा चौगुले .................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, इचलकरंजी (महावितरण) ............... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- राजेंद्र आण्णाप्पा चौगुले, ग्राहक
मुकुंद महादेव माळी, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- वासंती भरते, उपकार्यकारी अभियंता, इचलकरंजी

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १० एप्रिल २०२४

आदेश पारीत दिनांक :- २९ एप्रिल २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये तक्रार नामंजूर केली. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी दाखल केले.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १० एप्रिल २०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

➢ अपिलार्थी राजेंद्र आण्णाप्पा चौगुले हे खानाजगल्ली, इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील घरगुती ग्राहक (वीज जोडणी क्र.२५०६४३०५८३३९) आहेत. त्याबाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणेः

तक्ता क्रं. १

| Consumer No. | Name | Address | Date of Supply | Sacntion load | Tariff |
|---|---|---|---|---|---|
| 250643058339 | Rajendra Aannappa Chougele | C.S.No.17141 Ichalkaranji. | 07.02.2009 | 0.26 KW | Res-1 Phase |

➢ अपिलार्थीचे सदर जागेवर वडीलोपार्जीत कौलारू वीटांचे घर असून त्या घराचे सन २०१३ रोजी पक्के (विकसित इमारत) आरसीसीचे घर बांधण्याचा निर्णय घेतला. सदर घराचे बांधकाम करताना तळमजला या ठिकाणी सौ. मैनावती ग्यानचंद जैन यांना विक्रीसाठी देणेत आला व पहिला, दुसरा व तिसरा मजल्यावर अपिलार्थी व त्यांचे बंधू यांचे राहण्याचे ठरले. त्यानुसारचा दिनांक ८ फेब्रुवारी २०१३ रोजी वकीलांमार्फत रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून करार करण्यात आला व एकूण रू.१२ लाख फक्त (रू.२०५१/- प्रती चौ. फुटाने ६०० चौ. फुट जागा) देणेचे ठरले. *[नोट : मात्र नोटरी झालेल्या करारपत्रात एकूण रक्कम रू.१२ लाख याचा उल्लेख कुठेही स्पष्ट दिसत नाही, तसेच खरेदीखताची नोंदणी कायदेशीर करण्यात आलेली दिसून येत नाही]* करारापोटी सुरवातीला रू.३ लाख व शिल्लक रक्कम सहा महिन्यांत देण्याचे ठरले व ह्या आश्वासनावर त्यांना सुमारे जानेवारी २०१४ मध्ये सदर जागेचा ताबा देण्यात आला. हि बाब सुनावणी दरम्यान स्पष्ट करण्यात आली. त्यानुसार मुदत संपल्यानंतरही टप्प्याटप्प्याने मागील रू.३ लाख धरून एकूण रू.८ लाख देणेत आले. सौ. मैनावती जैन यांनी तोंडी विनंती केल्यानुसार उर्वरीत रक्कम अंदाजे रू.४ लाख देण्यासाठी सहा महिन्याचा अधिक अवधी देण्यात आला. पण आजपर्यंत सौ. मैनावती ग्यानचंद जैन यांनी कराराची एकुण रक्कम रू.१२ लाखापैकी अंदाजे रक्कम रू.४ लाख देण्यात आलेली नाही व त्याबाबत व्यवहार पुर्ण करून खरेदीखत ही तयार करून घेतलेले नाही.

➢ परंतू सौ. मैनावती जैन यांनी अपिलार्थीशी केलेल्या जुन्या कराराची मुदत संपलेनंतर दिनांक १३ जून २०१४ रोजी महावितरणकडे कागदपत्र सादर करून करार पूर्ण झाल्याचे दाखवून, महावितरणची दिशाभूल करून, अपिलार्थीच्या संम्मती व सही शिवाय त्यांच्या नावे वीज जोडणी घेतेली. अपिलार्थीने महावितरण कार्यालयात जाऊन सदर जोडणीबाबत चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, त्याबाबचे करारपत्र वीज जोडणी अर्जासोबत जोडल्याने वीज जोडणी

दिली आहे. परंतू सदरचे करारपत्र खरेदीपूर्वीचे असल्याचे निदर्शनास आले. सदर करारात वीज जोडणीबाबतचा कोणताही उल्लेख नाही वा खरेदी बाबतच्या सर्व बाबींची पुर्तता करण्यापुर्वी वीज जोडणी देण्याबाबतचा उल्लेख नाही. *[नोट : करारपत्रात वीज / पाणी जोडणी बाबत खालील प्रमाणे उल्लेख आहे :- "बांधकाम पुर्ण झालेनंतर सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार व देणार यांना नवीन लाईट व पाणी कनेक्शन घेणेचे झालेस ते लिहून घेणार व देणार यांनी स्वखर्चाने करणेचे आहे. त्यास एकमेकांनी विना हरकत सह्या, संमती देणेस आहे"].*

- वीज जोडणी मिळण्यासाठी अर्जासोबत सौ. मैनावती जैन यांनी कोणती कागदपत्रे सादर केली याबाबतची माहिती मिळण्याकरीता मे २०१६ मध्ये माहिती अधिकाराखाली माहिती मागितली असता, अशी माहिती मिळाली की, **अपिलार्थींच्या संम्मतीविना वीज जोडणी दिल्याचे स्पष्ट होते.** अपिलार्थीचा करार ८ फेब्रुवारी २०१३ रोजी झाला. त्यानंतर, सदर करार पुढील सहा महिण्यांत पूर्ण करावयाचा असतानाही **दिनांक १३ जून २०१४ रोजी** व्यापारी वीज जोडणी **दिली.** महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता सदर वीज जोडणी दिली असून, ती बेकायदेशीर आहे.

- प्रतिवादीने उच्च न्यायालयाच्या रिट पिटिशन नं १३२१७/२०१९ दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ च्या निर्णयाचा आधार घेऊन असे नमुद केले की, घर मालकाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव भाडेकरूला वीज नाकारली जाऊ शकत नाही. वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची तपासणी केली असता, त्यांत इचलकरंजी नगरपरिषद कर पावती, सि.स.क्र. १७१४१ चा उतारा, खरेदी करारपत्र व वटमुख्त्यारपत्र इत्यादी कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आले व त्या आधारे सौ.जैन यांना वीज जोडणी दिल्याचे दिसून येते. परंतू, अपिलार्थीने नमुद केले की, ही सर्व कागदपत्रे ही अपिलार्थींचीच आहे. सदर वीज जोडणीबाबत अपिलार्थीने सौ. जैन यांना केव्हाही परवानगी दिली नाही, त्यांनी जाणूनबुजून, दांडगाव्याने, राजकीय पाठबळाच्या जोरावर अपिलार्थीस अडचणीत आणण्याच्या हेतूने व बनावट कागदपत्रांच्या आधारे वीज जोडणी स्वतःच्या नावे करून घेतली, त्यास महावितरण कंपनीही तेवढीच जबाबदार आहे.

- सौ. मेनावती जैन यांच्याकडे उर्वरित रक्कमेची (अंदाजे रु.४ लाख) मागणी वारंवार करूनही सदर रक्कम न दिल्याने, अपिलार्थीने दिनांक ३१ मे २०२३ रोजी महावितरणला वकीलामार्फत चुकीची वीज जोडणी दिल्याबाबत नोटीस दिली, आणि त्यानंतर महावितरणच्या अतिरीक्त कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता यांना पत्र दिले. सहाय्यक अभियंता यांनी सौ. मैनावती जैन यांना दिनांक १७ जून २०२३ रोजी नोटीस पाठवून त्यांचे उत्तर मागितले. सौ. मैनावती जैन यांनी दिनांक २१ जून २०२३ रोजीच्या उत्तराने वीज जोडणी वापर बेकायदेशीर

असल्याचा दावा खोटा असल्याचे कळविले. त्यानंतर महावितरणकडे पुन्हा चौकशी केली असता त्यांनी सदर प्रकरणात महावितरणच्या 'विधी अधिकारी' यांची मदत घेत असल्याचे कळविले. **दिनांक १९ जुलै २०२३ रोजी महावितरणच्या 'विधी अधिकारी' यांने पत्रान्वये कळविले की जर ग्राहकाचा जागेवर जर ताबा असेल व वीज देयकांचा भरणा नियमित करत असेल तर केवळ तक्रारीच्या आधारवर वीज पुरवठा खंडीत केला जाऊ शकत नाही; तर न्यायालयाच्या विशिष्ट आदेशानंतर किंवा ग्राहकाला बेदखल केल्यानंतरच वीज पुरवठा खंडीत केला जाऊ शकतो.**

- अपिलार्थीने दिनांक ९ ऑगष्ट २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर तक्रार नामंजूर केली.

- मंचाने आदेशात निरीक्षण केले की, सौ. मैनादेवी जैन यांना दिनांक १३ जून २०१४ रोजी वीज जोडणी दिली. त्या दिवशी कारण घडल्याने त्यानंतर २ वर्षाच्या आत म्हणजे दिनांक १२ जून २०१६ पर्यंत तक्रार दाखल करणे अपेक्षित होते. तथापि, मंचाकडे दिनांक १ ऑगष्ट २०२३ रोजी तक्रार दाखल केली. म्हणून सदर तक्रार (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम 2020) मधील विनियम ७.९ अन्वये मुदतबाह्य आहे. परंतू प्रतिवादींचे म्हणने अपिलार्थींना दिनांक ३१ जुलै २०२३ रोजी मिळाले. त्यामुळे कारण घडल्याची (Cause of action) तारीख दिनांक ३१ जुलै २०२३ आहे, आणि सदर गाऱ्हाणे दोन वर्षांच्या आतील आहे. म्हणून ते मुदतबाह्य नाही. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात दाखल केले. अपिलार्थीने सौ. मैनादेवी जैन यांना महावितरणने दिलेली बेकायदेशीर वीज जोडणी रद्द करण्याची मागणी तक्रारीमध्ये केली.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १० एप्रिल २०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी राजेंद्र आण्णाप्पा चौगुले हे खानाजगल्ली, इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील घरगुती ग्राहक (वीज जोडणी क्र.२५०६४३०५८३३९) आहेत, त्याबाबतची माहिती तक्ता क्रं.१ मध्ये आहे. अपिलार्थीने त्यांच्या जागेमध्ये दुसऱ्याच्या नावे चालू असलेले, त्यांची कोणतीही प्रकारची संमती न घेता बेकायदेशीर वीज जोडणी रद्द करण्याबाबत तक्रार केली आहे.

- अपिलार्थी राजेंद्र आण्णाप्पा चौगुले व सौ. मैनावती जैन यांच्यामध्ये ८ फेब्रुवारी २०१३ रोजी वट खरेदी करार झाला आहे **व त्या करारामध्ये सदर मिळकती मध्ये वीज जोडणी घेणेस संमती दिली होती व त्यामुळे वेगळी संमती घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.**

➢ **सदर करारातील अट प खालीलप्रमाणे :**

*"प) बांधकाम पूर्ण झालेनंतर सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार व देणार यांना नवीन लाईट व पाणी कनेक्शन घेण झालेस ते लिहून घेणार व देणार यांनी स्वखर्चाने करणेचे आहे. त्यास एकमेकांशी विना हरकत सह्या, संमती देणेचे आहे."*

➢ सदरची वीज जोडणी ही सौ. मैनावती जैन यांच्या नावे असून त्याचा ग्राहक क्र. २५०६४८७०४४३३ असा आहे व ग्राहकाची सविस्तर माहिती खालील प्रमाणेः.

तक्ता क्रं. २

| Consumer No. | Name | Address | Date of Supply | Sacntion load | Tariff |
|---|---|---|---|---|---|
| 250648704433 | Smt. Mainadevi Gyanchand Jain | H.No.12/410 Prakash Light House | 13.06.2014 | 0.7 KW | LT-II Commercial |

➢ दिनांक १३ जून २०१४ रोजी सौ. मैनावती जैन यांनी अपिलार्थीच्या मिळकतीमध्ये वीज पुरवठा सुरू करून घेतला आहे, आणि याची सर्व माहिती अपिलार्थींना होती असे, सौ. जैन यांनी त्यांच्या दिनांक २६ डिसेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिवादींना कळविले.

➢ वीज कायदा २००३ कलम ४३ नुसार वीज वितरण कंपनी ही मालकाच्या अर्जावर किंवा जागेचा ताबा घेणारा व्यक्ती कडून अर्ज प्राप्त झाल्यावर वीज पुरवठा देऊ शकते. सदरची वीज जोडणी ग्राहक क्र. २५०६४८७०४४३३ ही सौ. जैन यांच्या नावे असून भारतीय वीज कायदा २००३ कलम २(१५) नुसार अपिलार्थी हे महावितरणचे ग्राहक / वापरदार नसून त्यांना मंचाकडे कोणतेही गाऱ्हाणे मांडण्याचा अधिकार नसून त्यांचा तक्रार अर्ज रद्द करण्यात यावा ही विनंती.

वीज कायदा २००३ च्या कलम २(१५) अंतर्गत 'गाऱ्हाणे' ची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

*'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा;*

तसेच वीज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

*"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज*

म.वि.नि.आ.

*पुरवठा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

- प्रतिवादीने दिल्ली उच्च न्यायालयाच्या रिट पिटिशन नं १३२१७/२०१९ दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ चा आदेश संदर्भित केला असून सदर आदेशात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

*"It is now well settled proposition of law that electricity is a basic amenity of which a person cannot be deprived. Electricity cannot be declined to a tenant on the ground of failure/refusal of the landlord to issue no objection certificate.*
*All that the electricity supply authority is required to examine is whether the applicant for electricity connection is in occupation of the premises in question"*

वरील आदेशाचा संक्षिप्त सारांश खालीलप्रमाणे

*घर मालकाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव भाडेकरूला वीज नाकारली जाऊ शकत नाही. वीज जोडणीसाठी अर्जदार संबधित जागेचा ताबेदार आहे की नाही, याची तपासणी वीज वितरण कंपनीने करणे आवश्यक आहे.*

- सौ. मैनावती जैन हे नियमित वीज देयकांचा भरणा करत आहेत. वीज ही एक अत्यंत अत्यावश्यक सेवा असल्यामुळे उच्च न्यायालयाच्या वरील निर्देशानुसार सौ. मैनावती जैन यांना वीज जोडणी दिनांक १३ जून २०१४ रोजी देण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम ७.८ अन्वये तक्रार उदभवलेल्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत म्हणजे दिनांक १३ जून २०१६ पुर्वी गाऱ्हाणे सादर करणे आवश्यक होते. परंतू तक्रारदार यांनी त्यांचे गाऱ्हाणे मंचाकडे १ ऑगष्ट २०२३ रोजी सादर केल्यामुळे सदरची तक्रार मुदतबाह्य असल्याने ती फेटाळण्यास योग्य आहे. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी हे महावितरण कंपनीची दिशाभुल करून वेळ वाया घालवत आहेत, तरी सदर अपिलार्थी यांचे गाऱ्हाणे फेटाळण्यात यावे हि विनंती.

४. सौ. मैनादेवी जैन यांनी त्यांच्या दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजीच्या लिखीत निवेदनातील सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- सौ. मैनादेवी जैन यांनी नमुद केले की, खानाजगल्ली, इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे सदरची वीज जोडणी त्यांच्या दिनांक १६ एप्रिल २०१४ रोजी विहित नमुन्यात, टेस्ट रिर्पोट, इतर आवश्यक कागदपत्रे, तसेच रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर संमती व

सहीसह सादर करून योग्य ती अनामत रक्कम व इतर शुल्क यांचा भरणा करून घेतलेली आहे.

- सदर इमारतीचा तळ मजल्याचा वापर सौ. मैनादेवी जैन ह्या त्यांच्या कार्यालयीन कामकाजा करीता करत आहेत. सदर ठिकाणी शॉप अॅक्ट, लायसेन्स इतर शासकीय प्रमाणपत्र रेकॉर्डवर इत्यादी कागदपत्रे ठेवली आहेत.

- अपिलार्थी व सौ. मैनादेवी जैन यांच्यात एकमेकाच्या समजुतीने दिनांक १७ जून २०१३ रोजी करारपत्र झालेले आहे. त्याबाबत सौ. मैनादेवी जैन यांनी करार रजिस्टर करून योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागून खरेदीपत्र पूर्ण करणेसाठी मागणी केली आहे, परंतू अपिलार्थीचे खरेदीपत्रासाठी लागणाऱ्या जागेची कागदपत्रे परिपूर्ण नाहीत, त्यामुळे नोंदणीकृत करारपत्र करता येत नाही व त्याची सर्व जबाबदारी ही अपिलार्थीची होती, व ते करण्यास अपिलार्थी टाळाटाळ करतात. मागील तक्रार अर्ज क्र.सअ/मध्य/इचल/१७५ दिनांक २१ जून २०२३ रोजी इचलकरंजी कार्यालयास दिली आहे.

- अपिलार्थी व सौ. मैनादेवी जैन यांच्यात दिनांक ८ फेब्रवारी २०१३ रोजी खरेदी करार केला आहे. **सदर करारामध्ये सदर मिळकतीमध्ये वीज जोडणी घेण्यास अपिलार्थीने संमती दिली आहे.** त्यामुळे अपिलार्थीची वेगळी संमती घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आजपर्यंत अपिलार्थीने योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही व त्या अभावी करारपत्र तयार करून सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करता आले नाही. या सर्व गोष्टी दिवाणी न्यायालयामध्ये ठरणार आहेत या गोष्टीचा विचार व्हावा.

- **सदर करारापोटी अपिलार्थींना खालीलप्रमाणे रक्कम देण्यात आली आहे.**

तक्ता क्रं. ३

| Area (sq.ft.) | Rate / sq. feet | Amount (Rs.) |
|---|---|---|
| 600 | 2051 | 1230600 |
| Amount paid till date | | 828458 |
| Balance amount | | 402142 |
| Cement & labour paid to contractor (S.S. Bhosale) | | 130000 |
| Amount not paid till date due to non registration of agreement | | 272142 |

वरील तक्त्याप्रमाणे सौ. मैनादेवी जैन यांनी देय रक्कमेपैकी बहुतांश रक्कम दिलेली आहे. त्याबाबत कागदोपत्री पुरावे बँक स्टेटमेंट वैगरे दिले आहेत. सदर जागेत सौ. मैनादेवी जैन यांचा व्यवसाय सुरू असून त्या जागेचा वीज पुरवठा बंद केल्यास त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे, याचा विचार मंचाने करावा. तसेच, अपिलार्थी हे विनाकारण मानसिक व शारिरीक त्रास देत आहेत व सौ. मैनादेवी जैन सदर मिळकत सोडून जावे या उद्देशाने अश्या प्रकारच्या तक्रारी करीत आहेत.

- सौ. मैनादेवी जैन यांनी त्यांच्या निवेदनात ए-१, डी-१ फॉर्म, इचलकरंजी नगरपरिषद कर पावती, सि.स.क्र.१७१४१ चा उतारा, खरेदी करारपत्र, वटमुख्त्यारपत्र, **किटी फॅब्रिक्स** यांच्या नावाने व्यवसाय नोंदणी पत्र, इचलकरंजी नगरपरिषदची कर भरणा केलेली पावती, बँक स्टेटमेंट, व त्यांच्या नावाने असलेला शॉप अॅक्ट परवाना इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

## विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे घरगुती ग्राहक आहेत व त्यांच्या वीज जोडणीची सविस्तर माहिती तक्ता क्रं.१ मध्ये नमुद केली आहे.

६. अपिलार्थींचे सदर जागेवर वडीलोपार्जीत विटांचे कौलारू घर होते. अपिलार्थींनी त्या घराचे सन २०१३ रोजी पक्के आरसीसीचे घर बांधण्याचा निर्णय घेतला. सदर घराचे बांधकाम करताना आर्थिक अडचण आल्याने तळमजलावरील ६०० चौ. फुटाचे दुकान विकण्याचा निर्णय झाल्याचे दिसते, त्यानुसार अपिलार्थी व सौ. मैनावती ग्यानचंद जैन यांच्यामध्ये मुद्रांक मुल्य रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर एकूण रु.१२,३०,६००/- (अक्षरी रुपये बारा लाख, तीस हजार सहाशे मात्र) (रु.२०५१/- प्रती चौ. फुटाने ६०० चौ. फुट जागा) चे खरेदी करारपत्र ८ फेब्रुवारी २०१३ रोजी करण्यात आले. सदर कराराची कुठेही योग्य प्राधिकरणाकडे नोंदणी करण्यात आलेला नाही, व त्याची कायदेशीर स्टॅप डयुटी (मुद्रांक शुल्क) भरलेली नाही.

७. अपिलार्थींने नमुद केले की, करारानूसार टप्प्याटप्प्याने रु.८ लाख देणेत आले व उर्वरित रु.४ लाख अजूनही देण्यात आलेले नाहीत. त्या कारणाने आजपर्यंत तो व्यवहार पूर्ण करून, खरेदीखत तयार करून घेतलेले नाही. प्रतिवादींनी नमुद केले की, सौ. मैनावती जैन यांना अपिलार्थींचा 'ना हरकत' प्रमाणपत्र न घेता, दिनांक १३ जून २०१४ रोजी संगनमताने बेकायदेशीर वीज जोडणी दिली. सौ.

मैनावती जैन यांनी रु.४ लाख अजुनही दिले नसल्यामुळे त्यांची अनधिकृत वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात यावी.

८. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी राजेंद्र आण्णाप्पा चौगुले व सौ. मैनावती जैन यांच्यामध्ये दिनांक ८ फेब्रुवारी २०१३ रोजी वट खरेदी करार झाला. सौ. मैनावती जैन यांनी त्या जागी वीज जोडणी मिळण्या करीता दिनांक १६ एप्रिल २०१४ रोजी विहित नमुन्यात, टेस्ट रिर्पोट, इतर आवश्यक कागदपत्रासह, तसेच, रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर संमती व सहीसह अर्ज केला. अर्जाची छाननी करून व स्थळ तपासणी करून सौ. मैनावती जैन या सदर जागी दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ पासून दुकान चालवीत असल्याचे निदर्शनास आले. उभय पक्षातील करारामध्ये सदर मिळकती मध्ये वीज जोडणी घेणेस संमती दिली होती. त्यामुळे वेगळी संमती घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणून योग्य ती अनामत रक्कम व अन्य चार्जेसचा भरणा करून सौ. मैनावती जैन यांना दिनांक १३ जून २०१४ रोजी महावितरणने वीज जोडणी दिली. याबाबत ग्राहकाची सविस्तर माहिती तक्ता क्रं.२ मध्ये दिलेली आहे.

९. सौ. मैनादेवी जैन यांनी दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजीच्या लिखीत निवेदनात नमुद केले की, नवीन वीज जोडणीसाठी परिच्छेद क्रं. ४ मध्ये उल्लेखीत सादर केलेल्या कागदपत्रांनुसार कायदेशीर वीज जोडणी घेतली आहे, व ती खंडीत करण्याचा प्रश्न उदभवत नाही. सदरहू दुकान २०१३ पासून त्यांच्या ताब्यात आहे व दुकानात होत असलेल्या धंदयावरच त्याचा उदरनिर्वाह होत आहे. अपिलार्थी हे त्या दुकानाचा नोंदणीकृत करार करत नाहीत; कारण, त्यांची करारासाठीची कागदपत्रे परिपूर्ण नाहीत. **अपिलार्थीने नोंदणीकृत करार करून दिल्यास सौ. मैनादेवी जैन या योग्य ती तडजोड करण्यास तयार आहेत.** परंतू अपिलार्थी त्याबाबत टोलवाटोलवी करतात.

दोन्ही पक्षकारांच्या आपापली बाजू मांडण्यावरून दिसते की, त्यांच्यात सदर मिळकतीबाबत सिव्हील कोर्ट केस (Civil Court Case) चालू आहे. अपिलार्थी हे सौ. मैनावती जैन यांना सदर मिळकतीतून काढण्यास इच्छूक आहे. मुळतः हे स्पष्ट नाही की, करारातील पूर्ण रक्कम रु.१२ लाख भरण्याच्या आधीच त्यांना सन २०१३ साली जागेचा ताबा का देण्यात आला? मात्र सन २०१३ पासून सौ. मैनावती जैन यांच्याकडे जागेचा ताबा आहे, याबाबत वाद नाही.

१०. अपिलार्थी हे घरगुती ग्राहक (क्र.२५०६४३०५८३३९) आहेत. अपिलार्थीची स्वतःच्या वीज देयकाबाबत काहीही तक्रार नाही. 'ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२०' च्या कलम २.१ (इ) अंतर्गत

'गाऱ्हाणेची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

*"'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरू शकणाऱ्या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करने किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालांच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गाऱ्हाणे, यांचा समावेश होतो."*

तसेच वीज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

*"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज पुरवढा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

वीज अधिनियम कायदा, २००३ प्रमाणे 'ग्राहकाची' व्याख्या व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० गाऱ्हाणेच्या व्याख्येनुसार 'गाऱ्हाणेची' व्याख्या एकत्रीतपणे विचारात घेता ग्राहकाच्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; याबाबत गाऱ्हाणे नाही. त्यामुळे दुसऱ्या पक्षकाराबाबत या क्षणी गाऱ्हाणे विनियमानुसार ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेच्या कक्षेत बसत नाही.

११. सौ. मैनावती जैन यांना वीज जोडणी दिनांक १३ जून २०१४ रोजी देण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम ७.८ अन्वये तक्रार उद्‌भवलेल्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत, म्हणजे दिनांक १३ जून २०१६ पूर्वी गाऱ्हाणे सादर करणे आवश्यक होते. अपिलार्थीचे म्हणणे आहे की, सदर घटना (Cause of Action) दिनांक ३१ जुलै २०२३ रोजी घडली, कारण प्रतिवादीचे म्हणणे अपिलार्थीला तेव्हा कळले. परंतू हे तथ्य पटण्यासारखे नाही. वर्ष २०१६ साली माहितीच्या अधिकारान्वये अपिलार्थीला कळले होते की, सौ. मैनावती जैन यांनी

कोणत्या कागदपत्रांच्या आधारे वीज जोडणी मिळाली आहे, व त्यास अपिलार्थींची संमती होती की नाही. तरी त्यांनी महावितरणनला २०२३ साली वकीलांची नोटीस पाठवली. म्हणजे सन २०१६ ते २०२३ या ७ वर्षात ते गप्प राहीले, वा मंचाकडे किंवा महावितरणकडे तक्रार दाखल केली नाही.

त्याशिवाय अपिलार्थीच्या संमती संबंधी सुध्दा मुद्दा उपस्थित होतो की, झालेल्या करारपत्रात त्यांनी आधीच वीज जोडणीसाठी संमती दिली होती किंवा नाही. याबाबतची माहिती परिच्छेद ३ मध्ये सदर करारपत्रातील अट 'प' खालील प्रमाणे नमुद आहे :-

*"बांधकाम पूर्ण झालेनंतर सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार व देणार यांना नवीन लाईट व पाणी कनेक्शन घेण झालेस ते लिहून घेणार व देणार यांनी स्वखर्चाने करणेचे आहे. त्यास एकमेकांशी विना हरकत सह्या, संमती देणेचे आहे."*

करारातील अट 'प' शब्दप्रयोग अस्पष्ट व मोघम आहे. त्याचा अर्थ (interpretation) दोन्ही तऱ्हेने होऊ शकतो. अपिलार्थीचे म्हणणे आहे की, सदर संमती भविष्यात देण्याची होती. परंतू अस्पष्ट शब्द प्रयोगाचा अश्या प्रकारे त्यांना फायदा घेता येणार नाही. जरी स्पष्टपणे संमती दिली नसली, तरी खाली परिच्छेद क्रं.१२ मध्ये दिलेल्या कारणामुळे वीज जोडणी देणे नाकारू शकत नाही.

ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० च्या कलम ७.८ खालीलप्रमाणे.

*"कारवाईचे कारण उदभवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

परंतू तक्रारदार यांनी त्यांचे गाऱ्हाणे मंचाकडे १ ऑगष्ट २०२३ रोजी सादर केल्यामुळे सदरची तक्रार मुदतबाह्य असल्याने ती फेटाळण्यास योग्य आहे.

१२. वीज कायदा २००३ मधील तरतूदीबाबत

सदरहू तरतूद इंग्रजी भाषेत उदधृत केले आहे ती खालीलप्रमाणे.

*The distribution licensee is not required to go into the ownership dispute of the premise, and is only required to see whether the Applicant of new connection (Mainadevi Jain) has occupied the shops or not. The relevant provisions of Section 43 of the Electricity Act, 2003 which specify Duty to supply on request are quoted below:*

*"43. Duty to supply on request –*

*(1) Every distribution licensee, shall, on an application by the owner or* ***occupier*** *of any premises, give supply of electricity of such premises, within one month after receipt of the application requiring such supply: ……………………… …………………….. ……………………… ………………… ………… ……………………………………………………………………………………………*

*(3) If a distribution licensee fails to supply the electricity within the period specified in sub-section (1), he shall be liable to a penalty which may extend to one thousand rupees for each day of default".*

*In the Act, there is no definition of the word "occupier." The occupier of any building or land means a person in occupation of that building or land in general. An occupier should be at least in settled possession. The phrase 'settled possession' implies that the occupier should have been utilized in the premises, or in the case of commercial premises, should have been running a shop in the premises for a long time, with electric supply, and that disconnection of electric supply would thus lead to loss of an existing business in case of commercial premises.*

१३. वरील सर्व बाबींचा विचार विनियम करता खालील मुद्दे उपस्थित होतात.

- अपिलार्थींनी मागणी केल्याप्रमाणे ग्राहक क्रं. २५०६४८७०४४३३ सौ मैनादेवी जैन यांचा वीज पुरवठा खंडीत करणे योग्य आहे का?
  उत्तर :- नाही.

- वीज कायदा २००३ च्या कलम ४३ नुसार वितरण कंपनी ही मालकाच्या अर्जावर किंवा **जागेचा ताबा घेणारी व्यक्ती कडून अर्ज प्राप्त झाल्यावर वीज पुरवठा देऊ शकते.** माननीय उच्च न्यायालयाचे रिट पिटीशन (सी) नं. १३२१७/२०१९ दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ चा आदेशान्वये घर मालकाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव भाडेकरूला वीज जोडणी नाकारली जाऊ शकत नाही. वीज जोडणीसाठी अर्जदार संबधित जागेवर आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रे व संबधित जागा महावितरणने तपासली असून त्या ठिकाणी सौ. मैनादेवी जैन यांच्याकडे २०१३ पासून दुकानाचा ताबा असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सौ. मैनादेवी जैन यांना वीज पुरवठयापासून वंचीत ठेवू शकत नाही. दोनही पक्षकारांचा वाद, तक्रारीचे स्वरूप हे मुळात सिव्हिल केस सारखे आहे म्हणजे मिळकतीशी संबधीत असल्याचे दिसते. त्याचा सिव्हील न्यायालयात निर्णय झाल्याशिवाय वीज जोडणी खंडीत करता येणार नाही.

१४. वरील सर्व बाबींचा एकत्रित उहापोह करता, व वस्तूस्थिती लक्षात घेता, मंचाचा आदेश कायम ठेवण्यात येत असून अपिलार्थीचे अभिवेदन फेटाण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. दुबरे
सचिव

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)